आर.सी.सी क्र. १५२६ /२०१८
सरकार विरुध्द दिलीप हाके
**निशाणी क्र. २९ / क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नाव – श्री. अनिल श्रीपतराव भुक्तार,**
वय – ५७ वर्षे, व्यवसाय – नौकरी प्रोफेसर,
निवासस्थान– नंदनवन कॉलनी, औरंगाबाद

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**
**श्री. द. रा. काठुळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –**

१. मी सन १९९१ पासुन विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद येथे नौकरी करतो. मी आरोपीला ओळखतो. आरोपी आमच्या विद्यालयात लॅब असिस्टंट म्हणून कार्यरत आहे. मी प्राचार्य असतांना पोलीस इन्स्पेक्टर श्री. शिवाजी चव्हाण, क्रांतीचौक पोलीस स्टेशन हे माझ्याकडे आले व त्यांनी मला म्हटले की, आरोपी विरुध्द तुमच्या संस्थेने एफ.आय.आर दिला आहे व त्या संदर्भात त्यांना चौकशी करायची आहे. तपासी अधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे मी आरोपीचे आमच्या विद्यालयात जमा असलेले दस्तऐवज पाहिले. मला आढळून आले की, आरोपीने त्याचे जातीचे प्रमाणपत्र दिले होते त्यामध्ये त्याची जात धनवट अशी नमुद होती. सदरचे प्रमाणपत्र समाज कल्याण अधिकारी, औरंगाबाद यांनी रद्दबातल केले होते. त्यानुसार आरोपी विरुध्द एफ.आय.आर. आमच्या संस्थेने केला होता. जात प्रमाणपत्र व त्याचे नेमणुकीचे आदेश हे दोन दस्तऐवज पाहिले. त्यानुसार पोलीसांनी माझा जबाब नोंदवुन घेतला.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी आरोपी पक्षा तर्फे श्री. ठाकरे ए.के, विधीज्ञ यांचे मार्फत–**

२. हे म्हणने खरे आहे की, ज्या वेळेस आरोपीची नेमणुक झाली त्यावेळेस मी संस्थेमध्ये प्राचार्य नव्हतो. हे म्हणने खरे आहे की, नेमणुक होते वेळेस आरोपीचे जात प्रमाणपत्र व सेवापुस्तीका पाहण्याचा योग आला नाही. हे म्हणने खरे आहे की, जातपडताळणी आयोगाकडे कुठले दस्तऐवज

पाठविण्यात आले होते, याची मला माहीती नाही. हे म्हणने खरे आहे की, मी प्रभारी प्राचार्य असतांना देखील आरोपीचे जाती प्रमाणपत्र गैर असल्याचे मला आढळून आले नाही. हे म्हणने खरे आहे की, आयोगाचा निकाल काय होता, हे मी स्वतः पाहिले नाही. हे म्हणने खरे नाही की, माझ्या सरतपासात सांगीतलेला मजकुर की, तपासी अधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे मी आरोपीचे आमच्या विद्यालयात जमा असलेले दस्तऐवज पाहिले, मला आढळून आले की, आरोपीने त्याचे जातीचे प्रमाणपत्र दिले होते त्यामध्ये त्याची जात धनवट अशी नमुद होती. सदरचे प्रमाणपत्र समाज कल्याण अधिकारी, औरंगाबाद यांनी रद्दबातल केले होते, हे खोटे सांगत आहे.

३. हे म्हणने खरे आहे की, आरोपीचे मुळ जात प्रमाणपत्र हे जात पडताळणी आयोगाकडे देण्यात आले होते. हे म्हणने खरे नाही की, फिर्यादी श्री. तुषार शिसोदे यांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आरोपीचे जातीचे कुठलेच दस्तऐवज पाहिले नाही.

**उलटतपास पुर्ण.**
समक्ष
–/स्वाक्षरीत/–
( एम. एस. सहस्त्रबुध्दे )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– ११/०५/२०२३.

**फेरतपास नाही.**
श्रवणोत्तर स्वीकृती.
–/स्वाक्षरीत/–
( एम. एस. सहस्त्रबुध्दे )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद